कामाच्या ठिकाणी महिलांच्या होणा-या लैंगिक छळाच्या तक्रारींची चौकशी करण्यासाठी गठीत "अंतर्गत तक्रार निवारण समिती" मधील अध्यक्ष व सदस्य बदलांबाबत......

**महाराष्ट्र शासन**
**गृहनिर्माण विभाग**
शासन निर्णय क्रमांक : समिती-२०१६/प्र.क्र.११६/प्रशा-१
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक:- ११ ऑगस्ट, २०२५.

**संदर्भ :** १) महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र. मकचौ-२०१३/प्र.क्र.६३/मकक, दि.१९.०६.२०१४
२) गृहनिर्माण विभाग, शासन निर्णय क्र. समिती-२०१६/प्र.क्र.११६/प्रशा-१, दि.१०.०८.२०१७
३) गृहनिर्माण विभाग, शासन निर्णय क्र. समिती-२०१६/प्र.क्र.११६/प्रशा-१, दि.२३.०२.२०२२
४) गृहनिर्माण विभाग, शासन निर्णय क्र. समिती-२०१६/प्र.क्र.११६/प्रशा-१, दि.१८.०८.२०२३

**प्रस्तावना :-**

कामाच्या ठिकाणी महिलांच्या होणा-या लैंगिक छळवणुकीस प्रतिबंध करण्यासाठी केंद्र शासनाकडून कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) अधिनियम, २०१३ व दि.०९.१२.२०१३ रोजी नियम प्रसिद्ध करण्यात आले आहेत. त्यानुसार संदर्भ क्र. २ येथील दि.१०.०८.२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये या विभागात "अंतर्गत तक्रार निवारण समिती" गठीत करण्यात आली होती. तसेच सदर समितीतील अध्यक्ष व काही सदस्य यांची अन्य विभागात बदली झाल्याने, सदर समितीची संदर्भ क्र. ३ व ४ येथील अनुक्रमे दि.२३.०२.२०२२ व दि.१८.०८.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये पुनर्रचना करण्यात आलेली होती. सदर समितीतील व पुनर्रचित समितीतील अध्यक्ष व काही सदस्य अन्य विभागात बदलीने रुजू झाले आहेत. त्यांच्या ऐवजी विभागातील अन्य महिला अधिकारी/ कर्मचाऱ्यांची अध्यक्ष व सदस्य म्हणून नियुक्ती करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) अधिनियम, २०१३ व दि.०९.१२.२०१३ चे नियम, अधिनियमातील तरतुदीनुसार, महिलांच्या होणा-या लैंगिक छळाच्या तक्रारींची चौकशी करण्यासाठी संदर्भ क्र. ३ व ४ येथील अनुक्रमे दि.२३.०२.२०२२ व दि.१८.०८.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये पुनर्गठित केलेल्या तक्रार निवारण समितीतील अध्यक्ष व सदस्यांऐवजी पुढीलप्रमाणे अध्यक्ष व सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे:-

| | | |
|---|---|---|
| १. | श्रीमती राजकुंवर संदीप डफळे, कक्ष अधिकारी | अध्यक्ष |
| २. | श्रीमती वंदना शंकर गुरव, सहायक कक्ष अधिकारी | सदस्य |
| ३. | श्रीमती मधुरा मनोज तटकरे, सहायक कक्ष अधिकारी | सदस्य |
| ४. | श्रीमती स्नेहा सुनिल मोजर, लिपिक-टंकलेखक | सदस्य |
| ५. | परिवर्तन महिला संस्था, सुदामा स्मृती, हनुमान नगर, प्रगती कॉलेज जवळ, डोंबिवली (पू.), महाराष्ट्र- ४२१ २०१. | अशासकीय सदस्य |

CamScanner

| | | |
|---|---|---|
| ६. | उप सचिव (आस्थापना) | निमंत्रित |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(सु. वि. उकिरडे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) अ.मु.स. (गृहनिर्माण) यांचे स्वीय सहायक, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई.
२) उप सचिव (श्री. कवडे /श्री. तरंगे) यांचे स्वीय सहायक, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई.
३) अवर सचिव, महिला व बाल विकास विभाग, नविन प्रशासन भवन, ३ रा मजला, मंत्रालय, मुंबई.
४) सर्व अवर सचिव/कक्ष अधिकारी, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) श्रीमती ज्योती पाटकर, परिवर्तन महिला संस्था, सुदामा स्मृती, हनुमान नगर, प्रगती कॉलेज जवळ, डोंबिवली (पू.), महाराष्ट्र- ४२१ २०१.
६) संबंधित अधिकारी/कर्मचारी, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) नोंदणी शाखा प्रमुख (नोंदणी शाखा), गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई.

यांना कळविण्यात येते की, पुनर्गठित केलेल्या तक्रार निवारण समितीच्या अध्यक्ष व सदस्य यांची नावे विभागातील फलकावर लिहिण्यात यावीत.

८) निवडनस्ती/वैयक्तिक नस्ती (प्रशा-१).